## राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक १४/०९/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि.१ जून ते १४ सप्टेंबर कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ९०८.४ मि.मी. असून दि.१४ सप्टेंबर, २०२० पर्यंत ९५१.५ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०४.७ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.१४.०९.२०१९ अखेर १०६९.१ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११७.७ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते १४ सप्टेंबर, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ०१ | नंदुरबार. |
| ४ | ७५ ते १०० % | १५ | ठाणे, रायगड, नाशिक, पुणे, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १८ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया. |

राज्यात दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ३ तालूक्यांत २५ ते ५० %, ३१ तालूक्यात ५० ते ७५ %, ११२ तालूक्यात ७५ ते १००% तर २०९ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**पर्जन्यमान तपशिल (मि.मी) दि.१४.०९.२०२० अखेर**



**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पिवळ्या खोडकिडीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, हेलीकोव्हर्पा, उंट अळी, खोडमाशी व तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

दि.१४.०९.२०२० अखेरच्या प्राथमिक अहवालानुसार किड/रोगाचा प्रादुर्भाव होऊन मूग, उडीद, सोयाबीन व संत्रा/मोसंबी या पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये मूग-५०४०३ हे., उडीद-१६३३८ हे., सोयाबीन-१,६२,१६९ हे. व संत्रा/मोसंबी-७,६४१ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. याशिवाय माहे, ऑगस्ट-२०२० व सप्टेबर २०२० मध्ये अतिवृष्टी / वादळी वारे व पुरामुळे बाधित झालेल्या क्षेत्राच्या प्राथमिक अहवालानुसार ११ जिल्हयातील १,६२,४७७ हे., क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये भात, भुईमूग, सोयाबीन, तूर, कापूस, ज्वारी, हळद, ऊस, मका, भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९८ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर १४३.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१.०%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर असून १४४.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.५८%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.१६.०९.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १३९.८८ लाख हे. (९२.४४%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १३८.७३ लाख हे. (९७.७१%) होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात भात पिक वाढ ते फुटवे फुटण्याच्या तर काही ठिकाणी पोटरी ते लोंबी धरणेच्या अवस्थेत आहे. नागली पिके वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहेत.बाजरी पिक पोटरी ते फुलोरा तर काही ठिकाणी दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीस सुरूवात झाली आहे.. मूग व उडिद पिके शेंगा भरणेच्या ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी सुरु आहेत. सोयाबीन व भुईमूग पिके फुलोरा, शेंगा लागणे ते शेंगा भरणेच्या तर काही ठिकाणी शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहे. कापूस पिक पाते धरणे ,फुले लागणे ते बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत तर सुर्यफुल पिक वाढ, फुलोरा तर काही ठिकाणी दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत. मका फुलोरा ,दाणे भरण्याच्या तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. तूर पिक फांद्या फुटणेच्या अवस्थेत आहे.

**खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.१४.०९.२०२० अखेर)**



## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




## खरीप हंगाम सन-२०२०-२१ म धील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (ऊस पिकासह) (क्षेत्र लाख हे.)




### विभागीय पिक परिस्थिती-

### कोकण विभाग-

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशतः ढगाळ होते. आद्रतेच्या प्रमाणात व तापमानामध्ये वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर ३.९७ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९.९२%) पेरणी झाली आहे. विभागात हळवे व निम गरवे भात पिक फुटव्याच्या ते निसवण्याच्या अवस्थेत आहे. नाचणी पिक वाढीच्या ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. तूर वाढीच्या अवस्थेत तर इतर कडधान्ये व तेलबिया पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड व निळे भुंगेरे या किडींचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. किड नियंत्रणाकरिता एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

**नाशिक विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवामान दमट होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर २०.१९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.२६%) पेरणी झाली आहे. विभागात सुर्यफुल, तूर, भात व नागली पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. मका पिक तुरे , कणसे लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा लागणे, शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिके दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी पूर्णत्वाकडे आहेत. भुईमूग पिक शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. बागायती कापूस फुले लागणे ते बोंडे धरण्याच्या अवस्थेत आहे. जिरायती कापूस पाते ते फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी फुलोरा ते दाणे भरण्याच्या व कारळा पिक फुलोरा अवस्थेत आहेत. बाजरी पिक पोटरी, दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. तीळ पिक फुलोरा ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर गर्डल बीटल,उंट आळी व खोडमाशी , कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**पुणे विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर ११.९१ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३७.३५%) पेरणी झाली आहे. विभागात मुग व उडीद पिके शेंगा भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत आहेत, काढणीची कामे सुरु आहेत. बाजरी व मका पिके दाणे भरणेच्या अवस्थेत आहेत. भात पिक वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक फांदया फुटण्याच्या अवस्थेत आहे. भुईमूग व सोयाबीन पिके फुलोरा, शेंगा लागणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहेत. कापूस पिक पाते, फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफूल पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळ्या खोडकिडीचा, मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, हेलीकोव्हर्पा व खोडमाशी, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. अहमदनगर जिल्हयात मूग पिकावर व सोलापूर जिल्ह्यात उडीद पिकावर विषाणुजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. मुग व सोयाबीन पिकावर मावा किडीचा सुर्यफुल पिकावर पाने खाणा-या अळीचा ऊस पिकावर लोकरी मावा किडीचा तर भूईमूग पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तपमानात वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.०३ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर ८.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.५८%) पेरणी झाली आहे. भात पिक वाढ, पोटरी ते लोंबी धरणेच्या अवस्थेत तर नागली पिक वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. मका पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक दाणे भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी कामे सुरु आहेत. सोयाबीन पिक शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु झाली आहे. मूग, उडीद व घेवडा पिके शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. भुईमूग पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी कामे सुरु आहेत. आडसाली ऊस फुटवेच्या अवस्थेत आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पोषक पर्जन्यमान असल्याने ऊसाची वाढ समाधानकारक आहे. सातारा व सांगली जिल्ह्यात सप्टेबर महिन्यात झालेल्या पावसामुळे बाजरी पिकाचे नुकसान झाले आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भुईमूग पिकावर हुमणीचा, मका पिकावर लष्करी अळी, सोयाबीन खोडकिड व पानेखाणारी अळी भात पिकावर काही ठिकाणी करपा रोगाचा व खोडकीड आणि तुडतुडे या किडींचा, ऊस पिकावर लोकरी मावा व हुमणी या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर २०.३१ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.४०%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी कणसे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे लागणे, दाणे भरणे तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा लागणे, शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.उडीद पिकाची काढणी चालू आहे. मूग पिकाची काढणी व मळणी अंतिम टप्प्यात आहे.कापूस पिक पाते, फुले ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.भुईमूग पिक फुले लागणे ते आऱ्या सुटण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक फांदया फुटण्याच्या अवस्थेत आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे. पिक संरक्षणासाठी कृषि विभागामार्फत उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर ऊंट अळी, गर्डल बीटल, पाने खाणारी अळी व हेलीकोव्हर्पा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा तर तूर पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवसाचे व रात्रीचे तापमान कमी होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर २८.७३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२.८२%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत तर बाजरी पिक वाढ,पोटरी ते फुलोरा अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा धरणे,शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिकांची काढणी प्रगतीपथावर आहे. कापूस पिक पाते व फुले लागणेच्या अवस्थेत आहे.तूर पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, खोडमाशी, उंट अळी व गर्डल बीटल, ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.काही ठिकाणी पानथळ जमीनीत निचरा न झाल्याने कापूस पिकाची आकस्मिक मर दिसून येत आहे.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली असून आद्रतेचे प्रमाण वाढले आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.२४ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर ३१.०१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६.१८%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस पिक फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे. लवकर पेरणी झालेली मूग व उडीद पिकांची काढणी प्रगतीपथावर असून उशिरा पेरणी झालेली पिके शेंगा धरणेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहेत.सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.तूर व कापूस पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर हेलीकोव्हर्पा, तंबाखुवरील पाने खाणारी अळी, उंट अळी, खोडमाशी व गर्डल बीटल, कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा, अमेरीकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला. अमरावती जिल्ह्यात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर विषाणू जन्य व मूळ कुजव्या रोगांचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.१४ सप्टेंबर, २०२० अखेर १९.२० लाख हेक्टर क्षेत्रावर (९९.७०%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. कापूस पिक पाते, फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत तर मका पिक फुलोरा ते तुरे लागणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक वाढ ते पोटरीच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक फुले लागणे,आऱ्या सुटणे तर काही ठिकाणी शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे. विभागात ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरस्थितीमुळे पिकांवर परिणाम झाला आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पीकावर लष्करी अळी , कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, भात पिकावर पिवळी खोडकिड, पाने गुंडाळणारी अळी व गादमाशी , सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, हेलीकोव्हर्पा, उंट अळी व खोडमाशी किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. काही ठिकाणी सोयाबीन पिकावर विषाणूजन्य रोग व मुळकूज या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि.१४-९-२०२० पर्यंत पेरणी अहवाल**

**क्षेत्र- हेक्टरमध्ये**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि१६/०९/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १४९७४४९ | १४७७८७९ | १५०१७९२ | १०० | १०२ | २ |
| २ | खरीप ज्वारी | ४८२४६१ | २७९३२८ | २७६३२२ | ५७ | ९९ | -१ |
| ३ | बाजरी | ६७१५९५ | ६५४८१२ | ६४०४५० | ९५ | ९८ | -२ |
| ४ | रागी | ९४७३१ | ७७२६६ | ६६६७५ | ७० | ८६ | -१४ |
| ५ | मका | ८३८०६० | ८६६००५ | ८८१११२ | १०५ | १०२ | २ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६१ | ३९२२३ | ३५२३० | ६७ | ९० | -१० |
| **खरीप तृणधान्य** | | **३६३६९५६** | **३३९४५१३** | **३४०१५८२** | **९४** | **१००** | **०** |
| ७ | तूर | १२७५९७१ | १२०७४७७ | १२४६२५१ | ९८ | १०३ | ३ |
| ८ | मुग | ४८३३४७ | ३२४४१८ | ३९४२०४ | ८२ | १२२ | २२ |
| ९ | उडिद | ३५८९५३ | २९०२८९ | ३८८५१८ | १०८ | १३४ | ३४ |
| १० | इतर कडधान्य | १००३२८ | ८७४५६ | १२३४९१ | १२३ | १४१ | ४१ |
| **एकूण कडधान्य** | | **२२१८५९९** | **१९०९६४१** | **२१५२४६४** | **९७** | **११३** | **१३** |
| **एकुण अन्नधान्य** | | **५८५५५५५** | **५३०४१५४** | **५५५४०४६** | **९५** | **१०५** | **५** |
| ११ | भुईमुग | १९८४३५ | १८७५०० | २००६५२ | १०१ | १०७ | ७ |
| १२ | तीळ | २३६७२ | १०७५१ | ८९२० | ३८ | ८३ | -१७ |
| १३ | कारळ | १९७२७ | ८१५३ | ७४०२ | ३८ | ९१ | -९ |
| १४ | सुर्यफुल | १७९६५ | १२७३७ | १४९५० | ८३ | ११७ | १७ |
| १५ | सोयाबीन | ३८८४६३३ | ३९५९५४९ | ४३२१९४५ | १११ | १०९ | ९ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८३६ | ६३१६ | ५८६१ | ४२ | ९३ | -७ |
| **एकूण तेलबिया** | | **४१५८२६८** | **४१८५००६** | **४५५९७२९** | **११०** | **१०९** | **९** |
| **१७** | **कापूस** | **४१८३८०१** | **४३८३७०७** | **४२२५२६३** | **१०१** | **९६** | **-४** |
| **एकूण पेरणी क्षेत्र** | | **१४१९७६२५** | **१३८७२८६६** | **१४३३९०३८** | **१०१.००** | **१०३** | **३** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **११५३९०** | **१२५४२७** | **१३** | **१०९** | **९** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३२८०३** | **१३९८८२५६** | **१४४६४४६५** | **९५.५८** | **१०३** | **३** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत